**ठळक बातम्या**

- विकसित भारत जी रामजी कायद्याची अधिसूचना प्रसिद्ध, १ जुलैपासून अंमलबजावणी सुरू होणार

- देशात पेट्रोलियम उत्पादनांचा तुटवडा नसून ६० दिवस पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारकडून स्पष्ट

- आसामचे मुख्यमंत्री म्हणून हिमंता बिस्वा सरमा यांचा उद्या शपथविधी

- नाशिकमधल्या टी सी एस महिला अत्याचार प्रकरणी आरोपी निदा खानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार ३१३ अंकांची घसरण, रूपयाही ८२ पैशांनी घसरला

**<><><><><>**

विकसित भारत जी रामजी अर्थात विकसित भारत रोजगार आणि आजिविका मिशन ग्रामीण कायदा २०२५ लागू करण्यासंदर्भात केंद्र सरकारनं आज अधिसूचना जारी केली. येत्या १ जुलै पासून देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १२५ दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल. केंद्रीय मंत्री शिवराज चौहान यासंदर्भात म्हणाले.

**- होल्ड - शिवराज चौहान बाइट - - -**

**<><><><><>**

देशात पेट्रोलियम उत्पादनांचा कोणताही तुटवडा नसून ६० दिवस पुरेल इतक्या कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. पश्चिम आशिया संघर्षाच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या अनौपचारिक मंत्रीगटाच्या पाचव्या बैठकीनंतर अध्यक्ष संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ही माहिती दिली. देशात ४५ दिवस पुरेल इतका स्वयंपाकाचा गॅस आणि ६० दिवस पुरेल इतका नैसर्गिक वायू उपलब्ध असल्याचंही

त्यांनी म्हटलं आहे. देशात ७०३ अब्ज अमेरिकन डॉलर इतकं परकीय चलन उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून स्वयंपाकाच्या गॅसचा पुरवठा सुरळीत सुरु असल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा आंतरमंत्रालयीन बैठकीनंतर वार्ताहरांना ही माहिती दिली. सरकार ग्राहकांपर्यंत इंधनाचा पुरवठा सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करत असल्याचंही त्या म्हणाल्या. गेल्या तीन दिवसात नोंदणी केलेल्या १ कोटी २६ लाख ग्राहकांना १ कोटी १४ लाख एलपीजी सिलेंडरचा पुरवठा करण्यात आल्याचही त्या म्हणाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पेट्रोल आणि डिझेलचा कमी वापर करण्याच्या आणि सार्वजनिक वाहने आणि कारपुलींगचा वापर करण्याच्या आवाहनाचाही त्यांनी पुनरुच्चार केला. त्या म्हणाल्या

**- - - होल्ड बाईट - - -**

रसायने आणि खते मंत्रालयाच्या सहसचिव अपर्णा शर्मा यांनी म्हटलं आहे की, देशात वर्षीच्या खरीप हगामासाठी खतांचा ५१ टक्के साठा उपलब्ध आहे.

**<><><><><>**

आसाममध्ये, हिमंता बिस्वा सरमा उद्या दुसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. गुवाहाटी इथे खानापारा इथल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या मैदानावर या शपथविधी सोहळ्याची तयारी करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. भाजपशासित राज्यांचे केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित राहतील. १२६ सदस्यांच्या आसाम विधानसभेत एनडीएने १०२ जागा मिळवल्या, तर भाजपने ८२ जागा आणि त्यांचे मित्रपक्ष, आसाम गण परिषद आणि बोडोलँड पीपल्स फ्रंट यांनी प्रत्येकी १० जागा जिंकल्या.

**<><><><><>**

सोमनाथ मंदिराच्या माध्यमातून देशाची अखंड भक्ती परंपरा आणि सांस्कृतिक धैर्य दिसून येत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधल्या सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माणाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं सोमनाथ अमृत

महोत्सवात ते बोलत होते. हजारो वर्षांपासून या मंदिरावर हल्ले होत आहेत. या हल्ल्यांमुळं देशाची संस्कृती नष्ट होईल असा विचार करणाऱ्यांचे मनसुबे फलद्रुप झाले नाहीत, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

आज प्रधानमंत्र्यांनी सोमनाथ महादेव मंदिरात पूजा केली. ध्वजारोहण सोहळ्यातही प्रधानमंत्री मोदी यांनी सहभाग घेतला. भारतीय हवाई दलाच्या सूर्यकिरण एअरोबॅटिक्स पथकाने सोमनाथ मंदिरावरच्या आकाशात चित्तथरारक हवाई कसरती सादर केल्या. तसंच हेलिकॉप्टरमधून मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

<><><><><>

नाशिक शहरातल्या टी सी एस मधल्या महिला अत्याचार प्रकरणातली आरोपी निदा खान हिला आज नाशिक रोडच्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. याआधी तिला पोलीस कोठडी देण्यात आली होती. तिची मुदत संपल्यानं आज तिला न्यायालयात हजर करण्यात आलं.

टीसीएस प्रकरणात पॉश कायद्याची अजिबात अंमलबजावणी झाली नाही, असा अहवाल राष्ट्रीय महिला आयोगानं नेमलेल्या समितीनं दिला आहे. कंपनीच्या नाशिक शाखेत कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात मानसिक आणि शारीरिक छळ झाल्याचंही या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधीवर सहमती होऊ न शकल्याचा फटका देशातल्या शेअर बाजारांना मोठ्या प्रमाणात बसला. सेन्सेक्स आज १ हजार ३१३ अंकांनी घसरुन ७६ हजार १५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३६० अंकांची घट नोंदवून २३ हजार ८१६ अंकांवर बंद झाला. ग्राहकोपयोगी वस्तू, बांधकाम उद्योग, सराफ व्यावसायिक, विमान कंपन्या यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात घसरले.

डॉलरच्या तुलनेत रुपया आज ८२ पैशांनी घसरला. त्यामुळे विनियम चलन बाजारात एका डॉलरसाठी ९५ रुपये ३१ पैसे मोजावे लागत होते.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये बिगर संविधानिक महामंडळ, संस्था , सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम यावरचे नियुक्त सदस्य, संचालक, अध्यक्ष यांचा कार्यकाळ तात्काळ प्रभावानं संपुष्टात

आणण्यात आला आहे. मुख्यामंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली, त्यात हा निर्णय झाला.

राज्यातल्या सनदी आणि पोलीस अधिकाऱ्यांना केंद्रीय प्रशिक्षण देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला. भारतीय न्याय संहिता राज्यात लागू करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. बांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी सीमा सुरक्षा दलाकडे जमीन सोपवण्याचा निर्णयही आज जाहीर झाला. याआधीच्या तृणमूल काँग्रेसच्या सरकारनं घुसखोरांना प्रोत्साहन देण्यासाठी हे जमीन हस्तांतरण रोखून ठेवलं होतं, असा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला.

**<><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज आय आय टी मुंबई इथं हवेतला कार्बन डायऑक्साइड जमा करून साठवण्याच्या प्रायोगिक तत्त्वावरच्या प्रकल्पाचं, आणि यासाठीच्या खनन प्रक्रियेचं उद्घाटन केलं. या प्रकल्पात कार्बन डायऑक्साइडपासून कॅल्शियम कार्बोनेट तयार करून पोलाद, रंग, सिमेंट आणि घरबांधणी उद्योगांमध्ये चुन्याऐवजी त्याचा वापर केला जाऊ शकतो, अशी माहिती प्रधान यांनी दिली. कार्बन उत्सर्जनाच्या जागतिक समस्येवर तोडगा काढणाऱ्या आय आय टी मुंबईच्या चमूचं त्यांनी अभिनंदन केलं. येत्या काही दिवसांत हा प्रकल्प व्यावसायिक तत्त्वावर कार्यान्वित केला जाईल आणि पुढच्या महिन्यात फ्रान्समध्ये होणाऱ्या भारत इनोव्हेट्स परिषदेत हा प्रकल्प सादर केला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.

**<><><><>**

आयसीसी पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट संघाच्या क्रमवारीत भारताचा प्रथम क्रमांक कायम राहिला आहे. आज आयसीसीनं ही क्रमवारी जारी केली. दुसऱ्या क्रमांकावर न्यूझिलंड असून ऑस्ट्रेलिया तिसऱ्या तर दक्षिण अफ्रिका चौथ्या आणि पाकिस्तान पाचव्या स्थानावर आहे.

**<><><><>**

इराण आणि अमेरिकेमधला तिढा अद्याप कायम असून पश्चिम आशियात नव्यानं अस्थिरता पसरली आहे. या आठवड्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या चीन दौऱ्यात चीनचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतील, अशी शक्यता आहे. अमेरिकेनं इराणवर

लादलेले निर्बंध कोणत्याही  वाटाघाटी होण्यापूर्वी मागे घेतले जावेत, अशी मागणी इराणनं केली आहे तर इराणनं आपल्याकडचा युरेनियमचा साठा देशाबाहेर काढावा, याबाबत इस्राएल आणि अमेरिका आग्रही आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज धर्मशाला इथं पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पंजाब किंग्जच्या ७ षटकात १ बाद ७८ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**